# प्रेसनोट

दिनांक ११/११/२०२०

स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय, कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई येथील सहायक संचालक यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| गुन्हा नोंद क्र. | :- | --- |
| कलम | :- | --- |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | दिपक शंकरराव काटे, सहा. संचालक, वर्ग - १, स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय, ६ वा मजला, कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.१०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार नोकरीस असलेल्या पंचायत समिती, खंडाळा चे लेखा परीक्षण पुन:र्विलोकन अहवाल सन २०१८-१९ मधील प्रस्तावित ०१ परिच्छेद (आक्षेप) कमी करण्यासाठी रू. ३,०००/- तसेच पुर्वीच्या सन २०१२-१३ अखेर समाविष्ठ असणा-या पंचायत राज समिती लेखा परीक्षण पुन:र्विलोकन अहवालामधील ०६ परीच्छेद (आक्षेप) वगळण्यासाठी रू. १२,०००/- असे एकुण रू. १५,०००/- लाचेच्या रक्कमेची लोकसेवक श्री. दिपक काटे हे फोनव्दारे तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १०/११/२०२० रोजी अे.सी.बी. नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/११/२०२० रोजीचे लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. काटे यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती रू. १०,०००/- मागणी करून स्विकारण्याचे मान्य केलेनंतर आज दिनांक ११/११/२०२० रोजीचे सापळा कारवाई दरम्यान स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय, ६ वा मजला, कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई याकार्यालयात लोकसेवक श्री. काटे यांनी तक्रारदार यांच्याकडून रू. १०,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लोकसेवक श्री. काटे यांना १३:०० वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्ॲप क्र. :- ९९३०९९७७००

शिवराज बेंद्रे
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

नवी मुंबई